सं.फौ.ख.क्र.३२६७०५/२००७
सरकार वि. देवेंद्र व इतर
<u>नि. क्र.५०</u>

<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ साक्षीदार</u>

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**नाव : तारासिंग लालसिंग जाधव**
**वय : ५५ वर्षे,**
**व्यवसाय : नोकरी–वाहतूक सक्करदरा, नागपूर.**
**राहणार : मनिष नगर, नागपूर.**

**<u>सरकारी पक्षातर्फे सरतपास सहायक सरकारी वकील ममता आवारीवार यांच्यामार्फत शपथेवर सुरूः</u>**

**०१.** सप्टेबर २००७ मध्ये मी पोलीस स्टेशन अजनी येथे कार्यरत होतो. त्यावेळी माझी नियुक्ती पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र.१ मध्ये विशेष पथकामध्ये होती. यातील घटना ही दिनांक २४.०४.२००७ रोजी सिताबर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये १८.०० वाजताचे सुमारास घडली. सदर दिवशी आम्ही झाशी राणी चौकामध्ये पेट्रोलींग करत असताना गुप्त बातमीदारामार्फ माहिति मिळाली की, भारत व पाकीस्तान मध्ये क्रिकेट मॅचला काही इसम सट्टा लावत आहे. त्यावेळी गस्तीवर मी, पीएसआय प्रदिप लांडे, आनंद वानखेडे, सतीश पांडे, प्रविण नागदिवे व इतर होतो. आम्हाला गुप्त माहिती मिळताच आम्ही सर्व सिताबर्डी पोलीस ठाण्यामध्ये गेलो व तेथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदिप बिजवे यांना घटनेबाबत माहिती दिली. त्यांना आम्ही दोन पंचासह मिळालेल्या माहिती आधारे वंदना कोऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी ब्लॉक क्र.सी–४ येथे गेलो. तेथे गेलो असता ५ इसम भारत पाकीस्तान

मॅचबाबत मोबाईलवर संभाषण करून कागदावर आकडे लिहीत असल्याचे आम्ही पाहिले. त्यावेळी आम्ही आमचा परिचय तसेच पंचांचा परिचय त्यांना दिला. सदर इसमाला त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नावे देवेंद्र बाबाराव शिर्के, प्रशांत ढेंगरे, मोटघरे, विक्की बाजावार व साखरे असे सांगितले. त्यांच्याकडून ,आम्हाला ९ मोबाईल, कागदी पान, एक डॉट पेन, कॅलकुलेटर, चार्जर, टिव्ही व बेडवर पसरलेली चादर व नगदी ४०,०००/– असा एकूण ८५,०५०/– किंमतीचा मुदेमाल मिळाला. सदर मुदेमाल वरिष्ठ पोलीस निरीक्षक बिजवे यांनी कारवाई करून जप्त केला. तपासादरम्यान तपासी अधिकारी यांनी माझा जबाब दिनांक २९.०९.२००७ रोजी घेतला होता. आज रोजी न्यायालयामध्ये दोन आरोपी हजर आहेत. त्यांची नावे मोटघरे व ढेंगरे अशी आहेत. मी त्यांना ओळखतो. सदर गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक बिजवे यांनी केला.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी क्र.२ तर्फे विद्यीज्ञ श्री. पी. आर. भूरे यांच्यामार्फत–**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, घटनेवेळी मी केवळ पथकामध्ये उपस्थित होतो, मी कोणतीही स्वतंत्र कारवाई केली नाही. मी जबाब देताना आरोपींची नावे सांगितली होती परंतु, त्यांची नावे जबाबामध्ये नमूद का नाहीत याचे कारण मी सांगू शकत नाही. घटनास्थळावर जाताना त्याबाबतची स्टेशन डायरीला नोंद वरिष्ठांनी घेतली असेल. त्याबाबत मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर आरोपी मिळून आले हे मी काल्पनिक कथन करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २४.०९.२००७ रोजी भारत व पाकीस्तान मध्ये कोणताही क्रिकेटचा सामना नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी आरोपी विरूध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी क्र.३ तर्फे विद्यीज्ञ श्री. आर. बी. ढोके यांच्यामार्फत–**

**३.** जप्त मोबाईल, टिव्ही कोणत्या कंपनीचे होते त्याचा खुलासा मी माझे पोलीसांना दिलेल्या जबाबामध्ये केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये नमूद केल्याप्रमाणे मुदेमाल जप्त करण्याच्या कारवाईवेळी मी तेथे उपस्थित नव्हतो. घटनेवेळी घटनास्थळावर आम्ही खाजगी वाहनाने गेलो होतो. मी पोलीसांना जबाब देतेवेळी कोणत्या वाहनाने गेलो ही बाब नमूद केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष कोणतीही कारवाई झाली नाही व मी आरोपींना पहिल्यांदाच न्यायालयात पाहिले. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KAUSTUBH NAGESH MARATHE
Date: 2025.11.15 14:55:27 +0530

**नागपूर.**
दि. १५/११/२०२५

**(कौस्तुभ नागेश मराठे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, नागपूर
कोर्ट क्र.१